# मिनी सोलर वॉटर हिटर बाजारात

कोल्हापूर :अग्री सोलर सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेड या सौर ऊर्जा उत्पादन निर्मितीमध्ये देशातील अग्रगण्य अशा कंपनीतर्फे भारतात पहिल्यांदाच मध्यमवर्गियास परवडेल असा 'मिनी सोलर वॉटर हिटर' बाजारात आणला आहे. हे उत्पादन पश्चिम महाराष्ट्रातील सर्व प्रमुख शहरांमध्ये उपलब्ध करण्यात आले आहे.

याविषयी माहिती देताना संचालक रवी पिट्टी यांनी सांगितले की, देशातील अशा प्रकारचा हा पहिला 'मिनी' सोलर वॉटर हिटर आहे. छोट्या व मध्यमवर्गियांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे असे हे उत्पादन आहे. हा वॉटर हिटर ५०, ७५ व १०० लिटर अशा तीन क्षमतेत उपलब्ध करण्यात आला आहे. याची किंमत ९ हजार ते १२ हजार रुपयांच्या दरम्यान असेल. सध्या सोलर वॉटर हिटर्स १७ हजारांपासून पुढच्या किंमतीत बाजारात उपलब्ध आहेत. उपयुक्तता व किंमतीच्या बाबतीत हे उत्पादन मोठी बाजारपेठ प्राप्त करेल, असे पिट्टी यांनी सांगितले.

कंपनीतर्फे नुकत्याच आयोजित परीक्षणानुसार राज्यातील छोट्या गांवामध्ये अशा प्रकारच्या छोट्या सोलर वॉटर हिटरची गरज आढळली. ही गरज कंपनीतर्फे अत्यंत रास्त, परवडणाऱ्या किंमतीत पूर्ण करण्यात येत असल्याचे पिट्टी यांनी सांगितले. पारंपरिक ऊर्जेची मर्यादित उपलब्धता, त्यांची वाढती किंमत व त्यांच्या वापरामुळे निर्माण होणारे प्रदूषण या गोष्टीवर सौर ऊर्जेसारख्या अपारंपरिक ऊर्जेचा वापर हाच उत्तम पर्याय आहे व त्याच्या प्रसारासाठी कंपनीतर्फे उचललेले हे पाऊल असल्याचे पिट्टी यांनी सांगितले.

नव्या छोट्या मॉडेलविषयी माहिती देताना पिट्टी म्हणाले की, अग्री सोलर वॉटर हिटिंग प्रणाली ही आय. एस. आय. दर्जा परिमाणांनुसारच बनविली जाते. नव्या मॉडेलला सौर ऊर्जेबरोबरच पावसाळ्यात वापरता येण्यासाठी इलेक्ट्रिकल बॅकअपची सोयहि देण्यात येत आहे. सर्वोत्तम दर्जाचे सोलर कलेक्टर्स, टफन्ड ग्लास शीट्स, सर्वोच्च दर्जाचे ऊर्जा संकलन करणाऱ्या तांब्याच्या प्लेटस्, व्यवस्थित इन्सुलेशन केलेली गरम पाणी साठविण्याची टाकी यासह रास्त किंमतीत हे उत्पादन बाजारात सादर होत आहे.

कंपनीतर्फे अपारंपरिक ऊर्जा मंत्रालयाकडे या उत्पादनाचा समावेश सॉफ्ट लोन योजनेअंतर्गत ( ५ टक्के दराने कर्ज) करण्याचा विनंती प्रस्ताव देण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी संपर्क पद्मसिया सूर्यवंशी - (०२३१) ६६१२५९ मोबाईल : ९८२२०२२६३१.